Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# इंदिरा गांधीच्या काळातील धोरणाचा अभ्यास

**डॉ. नीता जगताप**
इतिहास विभाग
समाजभूषण उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, पुणे

**प्रास्ताविक :**

इ.स. 1966 ते 1984 याकाळात इंदिरा गांधीचा कार्यकाळ होता. परंतु अपवाद 1977 ते 1980 चा कालखंडात नव्हत्या. इंदिरा गांधीच्या काळातील आर्थिक धोरणे ही वास्तववादावर आखलेली होती. याकाळातील आर्थिक धोरणे ही समाजवादावर आधारित असून मिश्र अर्थव्यवस्थेला अनुसरून आखली गेली होती. प्रामुख्याने सार्वजनिक उद्योग, लघुउद्योग आणि गरीबासाठी पोषक होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक धोरणाचा अभ्यास पुढील तीन टप्प्यात करावा लागतो. 1952-1966, 1966-84 आणि 1984 पासूनचा काळ होय. प्रामुख्याने इंदिरा गांधीच्या काळात शेतीचा आर्थिक दर सर्वात जास्त होता. परंतु औद्योगिक विकास दर अत्यंत चिंताजनक स्थितीत होता.

**संशोधन पद्धतीच्या माहितीचे संकलन :**

संशोधन पद्धतीचा अभ्यास हा ऐतिहासिक दृष्टीकोन विस्तृत स्वरूपात आहे. तसेच संशोधनाचा मुख्य उद्दिष्ट हे इंदिरा गांधीच्या कालखंडातील इ.स. 1966 ते 1984 पर्यंतच्या आर्थिक सामाजिक, सुरक्षा धोरणाचा अभ्यास करणे. संशोधनासाठी काही प्राथमिक साधने, दुय्यम साधने, संशोधन पेपर आणि वर्तमान पत्राचा वापर करण्यात आला आहे.

**इंदिरा गांधीच्या आर्थिक सुधारणा :**

भारतीय अर्थव्यवस्थेपुढे महागाई, बेरोजगारी, दुष्काळ, अन्नधान्य टंचाई आणि मंदी या प्रमुख समस्या होत्या. दरम्यान काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर तेलाच्या किंमती वाढ त्यामुळे भारताचा महागाई दर 1970 ते 1973 या काळात 5.5% वरून 20 टक्केपर्यंत वाढलेला दिसून येतो.

**20 कलमी कार्यक्रम :**

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जुलै 1975 ला रोडिओवरून 20 कलमी कार्यक्रमाची घोषणा केली. आर्थिक सुधारणेची रूपरेषा पुढीलप्रमाणे -

- कमाल जमिनसुधारणा कायदा.
- गरीबासाठी घरकूल योजना.
- शेती मंजुरी कायदा सुधारणा.
- वेठबिगारी अथवा गुलामी कायदा रद्द.
- पाणी सुधारणा योजना.
- हॅण्डलुम उद्योग सुधारणा
- कर सुधारणा
- नवीन कामगार कायदे
- रस्ते सुधारणा योजना
- उत्पन्न करावर सुट
- आर्थिक कमकुवत वर्गासाठी नोकरी आणि प्रशिक्षण
- अन्न-धान्य किंमतीवर सरकारी नियंत्रण
- मागासलेले भागाचा विकास
- ग्रामिण उर्जा

या 20 कलमी योजनेद्वारे राष्ट्राचा विकास करण्याची योजना आखली.

**इंदिरा गांधी व राष्ट्रीयकरणाची धोरणे :**

1960 या काळात भारतात बँकावर मोठ्या प्रमाणात खाजगी मालकी असल्यामुळे शेतकरी, कामगार वर्गाला कर्ज उपलब्ध होण्यासाठी अडचणी निर्माण होत. कॉंग्रेसमधील अर्थमंत्री मोरारजी देसाई हे बँकाचे खाजगीकरण करण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधीसाठी अडचणीचे ठरत असल्यामुळे इ.स. 1969 ला अर्थमंत्री पदाचा राजीनामा घेण्यात आला.

पंतप्रधान इंदिरा गांधींनी 1969 मध्ये बँकाचे राष्ट्रीयकरण करून आणले व मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात बँकाचे जाळे निर्माण केले. तसेच ग्रामिण भागातील छोटे शेतकरी यांना कर्ज मिळण्यास सुरूवात झाली.

एल. आय. सी. चे राष्ट्रीयकरण करण्यात आले. तसेच कोळसा खाणीचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

**कारखानदारी व व्यापारी धोरण :**

1973 साली मक्तेदारी विरोधात इंदिरा सरकारने धोरणे आखण्यास सुरूवात केली होती. याच काळात ''मक्तेदारी विरोधी'' कायदा केला व कोणताही भारतीय परदेशी चलन स्वत:जवळ ठेवणार नाही यासाठी कायदा करण्यात आला.

थोडक्यात याच काळात भारतात परवाना राज सुरू झाले. वेगवेगळ्या उद्योगासाठी परवानगी मिळविण्यासाठी भ्रष्टाचाराचा अवलंब करण्यास सुरूवात झाली.

**अणु कार्यक्रम आणि स्माईल बुद्धा :**

चीनने 1967 ला अनुबॉम्ब निर्मितीसाठी चाचणी केल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधींनी अणुबॉम्ब चाचणीसाठी प्रयत्न सुरू केले. डॉ. राजा रामाण्णा यांच्या नेतृत्वाखाली अणुबॉम्ब चाचणी 1974 ला पोखरण येथे करण्यात आली. या मिशनसाठीचा कोर्डवर्ड वापरण्यात आला तो "Smiling Buddha" हा होता.

## समारोप :

इंदिरा गांधींनी 16 वर्षाच्या कार्यकाळात विविध कल्याणकारी योजना आखलेल्या होत्या. बँक, विमा, कोळसा यांचे राष्ट्रीयकरण करून मक्तेदारी मोडण्याचा प्रयत्न केला. तसेच 20 कलमी कार्यक्रमाद्वारे सामाकजक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मोठे पाऊल उचलले. कमाल जमीन सुधारणा कायद्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता 22 करण्यासाठी प्रयत्न केले. तसेच वेठबिगारी कायदा करून गुलामीची पद्धत रद्द करण्यासाठी प्रयत्न केले. 20 कलमी सुधारणा कार्यक्रम हा ग्रामीण जीवनमान बदलण्यास मदत करतो.

1972 चे भारत-पाकिस्तान युद्ध जिंकून बांग्लादेशाची निर्मिती करून जबाबदार राष्ट्र अशी भारताची प्रतिमा तयार केली. तसेच 1974 ला अणुबॉम्ब चाचणी करून संरक्षणदृष्ट्या भारत सक्षम केल्याचे दिसून येते.

## संदर्भ साहित्य :

1) Jayakar Pupul "Indira Gandhi : A Biography Penguin Book - 1997.
2) रामचंद्र गुहा - ''गांधी नंतरचा भारत'' अनुवाद शारदा साठे - 2011.
3) Gupte, Pranay, "Mother India : A Political Biography of Indira Gandhi" Penguin Books 2012.
4) Indian Economy During Indira Gandhis Regime - A Study : - Dr. Parvathi - International Journal of Social Science Research and Development - Volume 1 Issue - 2 July December 2019.
5) Wikipedia.